पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/ १९७३ /१७
पुणे १ दिनांक :- / /२०१७
०७/०७/२०१८

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
**प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेन्टर सेन्युरी एन्का रोड, भोसरी, पुणे यांनी ग्लोबल टॅलेन्ट इंटरनॅशनल स्कूल, प्लॉट नं. ०१, स.नं.१३, चिखली प्राधिकरण ता. हवेली, जि. पुणे**

**विषय:-** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र २४) २ जुलै २०१३
२)शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २० जून २०१२
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क. एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, दि. १७/६/२०१६
४) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/ २०१६/ १६७८२७, दि. २७/७/२०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| ९१९ | प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेन्टर सेन्युरी एन्का रोड, भोसरी, पुणे ४११०३९ | ग्लोबल टॅलेन्ट इंटरनॅशनल स्कूल, प्लॉट नं. ०१, स.नं.१३, चिखली प्राधिकरण ता. हवेली, जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (सीबीएसई) | प्राथमिक | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१६-१७ |

अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१६-१७ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

पुणेजिल्हापरिषद,पुणे
यशवंतरावचव्हाणभवन
शिक्षणविभाग(प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/230/2022
पुणे1दिनांक:-17/02/2022

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
प्रितम मेडिकल फांऊडेशन ॲन्ड रिसर्च सॅन्टर सेंचरी एन्का कॉलनी नं.03,पूर्ण नाशिक रोड,भोसरी पुणे

विषय:- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2021-22 पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ शाळा सरू करण्यासाठी मिळालेल्या शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबते

*संदर्भ :- 1*. मा.सहसचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-32 यांचेकडील मान्यता पत्र क्र. एसएफएस-1021/प्र.क्र.586/एसएम-2, दिनांक-*11/01/2022*

*2.* शिक्षण उपसंचालक: *जा.क्र.शिउसं/प्राथ-2/स्वंयशाळा/मान्यता/पुवि/2022/1259 दिनांक-9/02/2022*

3.अध्यक्ष,प्रितम मेडिकल फांऊडेशन ॲन्ड रिसर्च सॅन्टर सेन्चुरी एन्का कॉलनी नं.03,पूर्ण नाशिक रोड,भोसरी पुणे यांचे 29/01/2022 चे पत्र

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 प्रितम मेडिकल फांऊडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर,नेअर सेंचरी एन्का कॉलनी नं.3,पुणे नाशिक रोड,भोसरी पुणे संचलित ग्लोबल टॅलेंट इंटरनॅशनल स्कूल,प्लॉट नं.01,स.नं.13,चिखली प्राधिकरण ता.हवेली जि.पुणे प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक 6 वी ते 12 वी, सर्व शाखा इंग्रजी माध्यम, संदर्भीय क्र.1 चे शासन आदेशान्वये शैक्षणिक वर्ष 2021-22 पासून मान्यता देण्यांत आलेली असून सदर मान्यता आदेशातील अ.क्र.1 ते 13 मुददयावरील नमूद केलेल्या अटी व शर्ती आपल्या संस्थेस/शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम 2020 मधील तरतुदीनुसार करण्यात यावी .

17.2.22
( कमलाकर रणदिवे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणेजिल्हापरिषद,पुणे

प्रत - माहितीसाठी सविनय सादर-
1)मा.अवरसचिव,शालेय शिक्षण व क्रीडाविभाग,मंत्रालय,मुंबई-32.
2)मा.शिक्षण संचालक(माध्य.वउच्च माध्य.),शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा.शिक्षण संचालक(प्राथमिक),शिक्षण संचालनालय,महाराष्ट्रराज्य,पुणे-1.